
NEHRU
BAL PUSTAKALAYA

नेहरू बाल पुस्तकालय

# काश्मीर

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय बा. वा.
दा. क्र. ११५५



BVBK-0401155

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

नेहरू बाल पुस्तकालय—३

# काश्मीर

छायाचित्रकार

**पी. एन. शर्मा**

लेखिका

**माला सिंग**

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. ११५५ दिनांक
क्र. ६४९
विषय किशोर

BVBK-0401155
BVBK-0401155

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया
नवी दिल्ली

सप्टेंबर १९७० (आश्विन १८९२)

© नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, १९७०

SHMIR (Marathi)
*Translated by*
Sai Paranjpye


मूल्य रु. १·५०

सेक्रेटरी नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-५ ग्रीन पार्क, नवी दिल्ली-१६, यांनी प्रकाशित केले व मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, गिरगाव, मुंबई ४ येथे छापले. चित्रे व कव्हराची छपाई, इंद्रप्रस्थ प्रेस, (सी. बी. टी.) नवी दिल्ली येथे केली.

# का श्मी र

पहाट झाली आहे—

तळयाच्या निळ्यानिळ्या लाटांवर सूर्य-प्रकाश पडतो आणि जिकडे तिकडे सोन्याचे पिचळेधमक पाणी चमकू लागते. मधूनच कमळाच्या पानांचा गडद हिरवा रंग दिसू लागतो. तर मध्येच सुळकन् एखादा मासा पाणकसामधून डोकावतो. आपल्या शेपटीने पाण्यावर फटकारा मारून तो लगेच गडप होतो. सगळीकडे उजेड झाल्याने भुरक्या अस्वलाची व निळ्या रंगाच्या खंड्याची (किंगफिशर) झोप मात्र चाळवली जाते! हा खंड्या पक्षी सदोदित मासे खायला टपून बसलेला असतो.



अशा प्रकारे काश्मीरमध्ये आणखी एक दिवस सुरू होतो.

पाच हजार फूट उंचीवरील काश्मीर खोऱ्याला चोहीकडून बर्फाळ शिखरांनी वेढलेले दृश्य पाहून लोक बेहद्द खूष होतात. काश्मिरच्या खोऱ्यातील जमीन झेलम आणि तिच्या उपनद्यांवर पोसलेली आहे. रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना 'पॉपलर' नावाचे वृक्ष येणाऱ्या जाणाऱ्या वाटसरूंना सलामी देत उभे आहेत असाचा भास होतो. डोंगरावरून सदासर्वदा पाण्याचे लोट खळाळून वाहात असतात आणि जिकडे तिकडे रंगीबेरंगी फुलांनी गच्च भरलेली कुरणे पाहून मनाला खूप आनंद वाटतो. असे सुंदर काश्मीर पाहायला जगातील नाना देशांतून लोकांच्या झुंडीच्या झुंडी काश्मीरकडे जात असतात. भारत सरकारने लोकांची ही हौस ओळखून काश्मीरला देशाचे प्रमुख प्रवासी केंद्र बनविले आहे. तेव्हा आज पंजाबी मद्रासी व गुजराथी भाई जर्मन,

फ्रेंच व अमेरिकन भाईंच्या खांद्याला खांदा लावून तेथे भटकताना दिसले तर त्यात काहीच नवल नाही, नाही का?

तेथील लहानशा एका घरात छोटा महमद गालिचे तयार करतो तो फक्त दहा वर्षांचा मुलगा आहे. आपल्या वडील भावाच्या जोडीने काम करायला त्याला लवकर





उठावे लागते. त्याच्या घरी लाल निळ्या फुलांचा पांढरा गालिचा हातमागावर विणला जात आहे. महमदला त्याच्या आजोबा पणजोबांप्रमाणेच आपल्या कारागिरीबद्दल खूप अभिमान आहे. गेल्या सहा पिढ्या त्यांचा हाच धंदा असल्याचे ते मोठ्या कौतुकाने सांगतात. काश्मीरमधील इतर अनेक कुशल हस्तकलांप्रमाणेच ही कलाही पंधराव्या शतकात, झैन–उल–अब्दिन या लोकप्रिय राजाने भारतात आणली. सुरवातीच्या नक्षीकामावर पर्शियन लोकांच्या कलेची छाप पडलेली दिसून येई. परंतु नंतर काश्मिरी कारागिरांनी स्वतःची अशी खास पद्धत तयार केली व बापाकडून मुलाकडे असा

त्या पद्धतीचा म्हणजेच कलेचा वारसा मिळत गेला. अशा प्रकारे वडिलांची कला मुलगा शिकत असे. व त्याचा मुलगा तेच काम करी. त्यात हळू हळू सुधारणा होऊन ही स्वतंत्र कला पूर्णावस्थेत जाऊन पोहोचली.








काश्मिरमध्ये आणखी एका घरात आठ वर्षांच्या एका मुलीला-सुद्धा लवकर उठावे लागते. तिचे नाव आयेशा आहे. तिच्या-बरोबर तिच्या बहिणीपण उठतात. दिवसभर जो उजेड असतो त्याचा त्यांना खूप उपयोग करून घ्यायचा असतो. टेबलक्लॉथवर कशिदा काढण्यात या मुली अगदी रंगून गेल्या आहेत. प्रत्येकजण एखादया खास नक्षीकामात हुशार आहे. प्रत्येकीने आपापल्या आवडीनुसार

काम वाटून घेतले आहे. सर्वांनी मिळून केलेल्या कामामधून एक निराळ्याच प्रकारचा सुंदर टेबलक्लॉथ तयार होत आहे. काही काळ गेल्यानंतर भारताच्या प्रत्येक घरातून अशा प्रकारचे असंख्य नक्षीकाम तयार झालेले आपणास दिसून येईल.

बाहेर स्टुलावर बसलेल्या म्हाताऱ्या अहमदने केव्हाच काम सुरू केले आहे. तो कागदाच्या लगद्यापासून सुंदर वस्तू तयार करतो. तो या कलेत फारच हुशार आहे.



आपल्या देशाचे सौंदर्य या कागदी चित्रांतून साकार करावे असे त्यास फार वाटते. हातातील ब्रशाने तो कागदाच्या लगद्याच्या त्या वस्तूंवर खूप छान छान चित्रे काढतो. 'चिनार' झाडाची पाने आयरिस फुले व गुलाब आणि चेरीचा मोहोर, तसेच वसंत ऋतूत येणारी बदामाची व पीचची गुलाबी व पांढरी शुभ्र झाडे तो जशीच्यातशी उतरतो. तळ्यावरून भिरभिरत जाणाऱ्या खंड्याचा निळा हिरवा रंग, तसेच पॉपलर वृक्षावर ऐटीत बसून गाणाऱ्या बुलबुल पक्ष्याच्या गालाचा लाल चुटुक रंग तो नेमका टिपून घेतो. ही कागदाच्या लगद्याची कला प्रथम पर्शियन लोकांनी आणली. लगद्याचे थरच्या थर एकत्र लिंपून लाकडी साच्यावर त्याला हवा तो आकार देण्याची ते जादू करतात. कागदाच्या लगद्याच्या नक्षीदार फुलदाण्या, कपबश्या, लोटे, भांडी आपण पाहिली असतीलच. लाकडी साच्यात हा लगदा घालून हवा तो आकार तयार झाला की मग ते लोक अशा भांड्यांवर चकाकी चढवितात. त्यानंतर यावर छपाई करतात.





याच वस्तीत आपली छिन्नी घेऊन बसलेला सुतार दिसतो. रोजच्या वापराच्या मामुली गोष्टींना तो सुबक रूप देतो. खुर्च्या, टेबले, कपाटे आणि सिगरेटच्या पेट्यांवर द्राक्षाचे घोस, चिनार पाने, आयरिस आणि कमळाची फुले शोभू लागताच त्या वस्तूंचा कायापालट होतो. अक्रोडाच्या लाकडाचा बराच वापर करतात. वरून हे लाकूड टणक असले तरी पोटात मऊ असते. काश्मिरच्या जंगलामधून त्याची निपज होते. या जंगलांचे महत्व अलिकडेच कळून आले आहे. आधुनिक औषधांना लागणारी औषधी आणि टरपेंटाइनला लागणारे रेझिन या अरण्यातून उपलब्ध होते.

साहजिकच त्या अरण्यांना काश्मिरचे 'हरित सुवर्ण' किंवा हिरवे सोने हे नाव प्राप्त झाले आहे. या जंगलांची राखण केली जात असून वनसंशोधनाला प्रोत्साहन दिले जात आहे.

गालिचे, कशिदाकाम, कागदकाम आणि लाकडावरचे कोरीवकाम याखेरीज काश्मीर शालींसाठी प्रसिद्ध आहे. सीझरच्या दरबारात, मौल्यवान वस्तूंच्या खजिन्यात, काश्मिरी शालींना सर्वांत अधिक मान होता असे म्हणतात. मोंगल आणि अफगाण राजांनी त्या शाली दूरदेशी धाडल्या होत्या. या शाली पश्मिन्याच्या असतात. बकऱ्याच्या पोटावर जी मऊ लव असते, तिच्यापासून त्या तयार करतात. नेपोलियनच्या काळात त्यांची फॅशन प्रथम फ्रान्समध्ये आणि नंतर साऱ्या युरोपभर बोकाळली होती. या शालींच्या वाढत्या मागणीमुळे गरीब कारागिरांच्या राहणीवर मात्र काही परिणाम झाला नाही. शालींचे व्यापारी तेवढे आपल्या हुक्क्यामध्ये पाण्याऐवजी दूध घालू लागले.

या प्रदेशात मलबेरी झाडे खूप आढळतात. हजारो खेडूत रेशमासाठी त्यांची जोपासना करतात. शेती बंद असलेल्या मोसमात रेशमाचा धंदा किफ़ायतशीर ठरतो. हा धंदा शेकडो वर्षांपासून चालत आला आहे. मोंगलांच्या काळात दरबारच्या ललना या मऊ मुलायम कापडावरून जीव ओवाळून टाकीत असत असे सांगतात. पुढे १८७८ मध्ये झाडावर जो रोग आला त्यात हा धंदा जवळजवळ बुडाला. काही वर्षांनंतर एक काश्मिरी काबूलला गेला. व त्याने याच प्रकारच्या, काही पौंड वजनाच्या बिया गोळा केल्या. आणि ते सारे बी अक्रोडांच्या टरफलांमधून लपवून परत काश्मिरला

आणले. आज हा धंदा अद्ययावत करण्यात आला आहे. श्रीनगर आणि जम्मूला रेशीम तयार होते.

सूर्य आभाळात बराच वर चढला आहे. शेतांमधून बायका, पुरुष अणि मुले, गुडघा गुडघा पाण्यात ओणवे वाकून भाताची पेरणी करीत आहेत. जम्मूकाश्मीरमधील एंशी टक्के जनता उपजीविकेसाठी जमिनीवर अवलंबून आहे. अलिकडे खोदलेल्या कालव्यांमुळे ओसाड जमिनींतूनही भाताची आणि गव्हाची गच्च पिके डुलताना दिसतात. सर्वांत महत्वाचे पीक भाताचे. उत्कृष्ट जातीची रोपे, पांटबंधाऱ्यांमधील सुधारणा, खते आणि कीटकनाशक औषधीचा भरपूर वापर. यामुळे भारतातील इतर








कोणत्याही प्रांतापेक्षा काश्मिरमध्ये अधिक भात पिकते. येथील जमीन पाणी फार शोषून घेते, त्यामुळे पेरणीपासून जवळजवळ कापणीपर्यंत पाणी देत राहावे लागते. गहू आणि मका ही येथील अन्य मुख्य पिके. लडाखमध्ये मात्र अधिक प्रमाणात ग्रिम नावाचे एक जवस पिकवितात.

काश्मीर फळांचा देश आहे. वसंतऋतूत गुलाबी आणि पांढऱ्या मोहोराने डवरलेली झाडे डॅफोडिल, आयरिस आणि क्रोकस फुलांनी बहरलेल्या कुरणांची राखण करतात. मोहोर लवकरच गळून पडतो आणि झाडांवरून रसाळ सफरचंदे, पेअर्स, पीचेस आणि प्लम्स लटकू लागतात. गेल्या ५० वर्षांत काही विदेशी जातींच्या फळझाडांची कलमे यशस्वी रीत्या लावण्यात आली आहेत.





पंपूर नावाच्या लहानग्या खेड्यात केशराची जांभळी शेते आहेत. केशर पैदा करणारा भारतामधला हा एकमेव विभाग आहे. याच्या लागवडीसाठी एका विशिष्ट प्रकारची उतरणीची जमीन लागते. एकदा कांदा पेरला की पुढे चौदा वर्षे त्याच्याकडे पाहावे लागत नाही. नवे कांदे आपोआप उगवत राहतात. जुने सडून जातात. फुले ऑक्टोबरमध्ये उगवतात. त्यावेळी पंपूर खेडे जांभळा शेला पांघरून बसले आहे असे भासते. केशराचा मंद गंध हवेत दरवळत राहतो, केशराचे नाना उपयोग आहेत. औषधी आणि धार्मिक उपयोग तर आहेतच. पण तऱ्हेतऱ्हेच्या स्वादिष्ट पाककृतींची लज्जत वाढविण्यासाठी केशराचा वापर केला जातो.

वर, दाट झाडी असलेल्या डोंगराळ मुलखावर, पाइन, ओक आणि फरची अरण्ये आहेत. या अरण्यांतून जंगली फुलांनी गजबजलेली कुरणे आहेत. तेथे मेंढपाळ

आपले कळप चरायला नेतात. मेंढ्या आयरिस, डेझी, व्हायलेटस आणि फरगेट–मी–नॉटसारख्या फुलांचा आस्वाद घेत चरत राहतात, मेंढपाळ स्वप्नाळू डोळ्यांनी आभाळात तरंगणाऱ्या ढगांची आणि दूरवरच्या बर्फाच्छादित शिखरांची शोभा पाहात बसून राहतो. शाली, नमदे, गब्बे आणि गालिचे यांसाठी लोकर आवश्यक असल्या-मुळे मेंढ्यांच्या उत्तमोत्तम जाती या प्रांतात पोसल्या जातात.

भारतीय गणराज्यामधल्या सर्वांत मोठ्या प्रांतांमध्ये जम्मू आणि काश्मीरचा समावेश होतो. लडाखही या राज्यात मोडते. अति उत्तरेला असलेल्या या प्रांतात हवामानाचे बदल प्रखरतेने जाणवतात खुद्द काश्मिरच्या खोऱ्यातली समशीतल हवा, जम्मूमधला दमट उष्मा आणि लडाखमधील कडाक्याची थंडी अशी हवेची नाना रूपे दिसून येतात. साहजिकच लोकांच्या रीतीरिवाजांवर आणि पोशाखावर त्याचा परिणाम होतो.

जम्मूच्या पठारावरून खाली नजर फेकली की उतरणीवर आंब्याच्या राई दिसतात. जम्मूमधील रहिवासी उत्साही आणि काटक आहेत. ते डोगरी भाषा बोलतात. त्यांच्या आवडत्या भांगडा नृत्यात त्यांच्या दांडग्या उत्साहाचे प्रत्यंतर दिसून येते.





उत्तरेकडच्या खोऱ्यामधल्या काश्मिरी लोकांचा पोशाख त्यांची लहानखोरी चण आणि नीटस अवयव यांना अधिक उठाव देतो. हा पोशाख म्हणजे वर फैरन नावाचा ढगळ कुडता आणि खाली सैल सलवार. बायका डोक्यावर छोटी टोपी घालतात; आणि अंगावरून चादर लपेटून घेतात. पुरुष डोक्याला गच्च बसणारी गोल टोपी घालतात. थंडीत ते 'कांगडी' वापरतात. कांगडी म्हणजे धगधगते निखारे घातलेली, वेतकामाने वरतून मढविलेली कापरी शेगडी. ही शेगडी सतत मंद ऊब देत राहते.

काश्मिरी स्त्रियांचे सौन्दर्य प्रसिद्ध आहे. सतराव्या शतकात बर्नियें नावाच्या फ्रेंच प्रवाशाने काश्मिरला भेट दिली. काश्मिरी ललना पाहण्याची त्याची उत्कट इच्छा



होती. वधूसंशोधनाला आलेल्या पर्शियन सरदाराचे त्याने सोंग घेतले आणि मनसोक्त सौंदर्यवती कुमारिका पाहून घेतल्या. युक्ति लागू पडली. काश्मिरी युवतींचे सौंदर्य खरोखरच अनुपम आहे असा निर्वाळा त्याने दिला.





काश्मीरमधले लोकप्रिय पेय म्हणजे चहा. हे लोक खूप चहा पितात. मात्र हा चहा फार निराळा असतो. सोडा बायकार्बोनेट घालून चहा खळखळून उकळतात, आणि मग त्यात दूध घालतात. मग हे मिश्रण गुलाबी होते. त्यान साखरेऐवजी मीठ घातले, की चहा तयार !



डोंगराळ भागात राहणारे गुजर हे भटके लोक. त्यांची जिप्सी राहणी, त्यांचे रीतिरिवाज काहीसे गूढ आहेत. एका अद्भुत आणि रहस्यमय वातावरणात ते अलिप्त-पणे वावरत असतात. उन्हाळ्यामध्ये जम्मूच्या उष्ण प्रदेशातून मुक्काम हालवून ते आपल्या मेंढ्या बकऱ्यांसह काश्मिरच्या थंड परिसरात निवास करतात. मक्याची भाकरी, लोणी आणि दूध हा या काटक लोकांचा आहार आहे.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. ११५५. दिनांक ......
विषय ...किशोर... क्र. ...६४१..



जगातल्या सर्वांत अधिक उंचीवरच्या वस्त्यांमध्ये लडाखचा समावेश होतो. १२,००० ते १५,००० फूट उंचीवर लोक राहतात. तेथील निसर्गसौंदर्य अफाट पसरलेले आहे. काळया कड्याकपारीचे रूक्ष सौंदर्य तेथे आढळते. लडाखचा प्राचीन इतिहास तिबेटशी मिळताजुळता आहे. परंतु बौद्धधर्मामुळे लडाखचे धागे भारताशी जुळलेले होते. त्यामुळे ते संबंध कायम राहिले. लडाखचे मुखवट्यांचे नृत्य प्रसिद्ध आहे. हे नृत्य धार्मिक असते, आणि ते करणाऱ्यांना पुण्य प्राप्त होते असा समज आहे. बौद्धधर्माच्या उदयापूर्वी बोकाळलेल्या राक्षसांचा पद्मसंभवाकडून पराभव, ही या नाचाची कथावस्तू आहे. पद्मसंभव म्हणजे सत्य. लडाखचे लोक दिसायला मंगोलियन दिसतात. उंच गालफडे आणि कमी उंची ही त्यांची वैशिष्ट्ये होत. लांब डगले आणि कानावर झापडे असलेल्या टोप्या ते वापरतात. पिंडाने हे शेतकरी






आहेत. नांगराला 'झो' नावाचा प्राणी ते जुंपतात. याक आणि गाय यांच्यामधला हा प्राणी आहे. 'ग्रिम' नावाचे धान्य हा त्यांचा मुख्य आहार असतो त्याच्या पिठात ते चहा आणि लोणी मिसळतात. चहा करण्याची त्यांची पद्धती वैशिष्ट्यपूर्ण आहे. कडक चहामध्ये सोडा, लोणी आणि मीठ घालून ते खूप घुसळतात. वर फेस आला की चहा तयार.
















लडाखमध्ये निराळ्याच प्रकारची विवाहपद्धती रूढ आहे. एका स्त्रीला एकाहून अधिक नवरे असू शकतात. मात्र नवऱ्याच्या सख्ख्या भावांनाच हा मान मिळू शकतो! सगळ्यांत मोठ्या भावाचे लग्न होताच जमिनीचा मालकी हक्क आपोआप त्याच्याकडे जातो. साहजिकच जमिनीची विभागणी होत नाही. पिढ्यानपिढ्या ती जेवढीच्या तेवढी व संकलित राहते.

जम्मूकाश्मीरने केलेली शैक्षणिक प्रगती वाखाणण्यासारखी आहे. तेथील साक्षरतेचे






प्रमाण दरवर्षी वाढते आहे. किंडरगार्टन ते पदव्युत्तर शिक्षणक्रमापर्यंतचे शिक्षण फुकट असलेला भारतामधील हा एकमेव प्रांत असावा.

आरोग्यासंबंधी अवघ्या देशात सर्वांगीण सुधारणा करण्यात आली आहे ती या प्रांतातही आढळते. नोकरवर्ग आणि साधने परिपूर्ण असलेले दवाखाने आणि औषधालये जागोजाग उघडलेली आहेत. वीस वर्षांपूर्वी काश्मिरी माणूस, बत्तीस वर्षांहून अधिक जगण्याची आशा बाळगीत नसे. आता नातवंडांना आपल्या पायावर उभे राहिलेले पाहाण्याचे स्वप्न तो उराशी बाळगू शकतो.

# काश्मिरचा इतिहास



काश्मिरचा उगम कसा झाला हे एक गूढ आहे. लोकप्रवाद असा आहे, की एकेकाळी तेथे फक्त एक तळे होते, ते कश्यप ऋषीने मोठ्या चातुर्याने कोरडे केले. त्याच्या गौरवार्थ, त्या कोरड्या तळ्याला 'कश्यप – मार' असे नाव ठेवण्यात आले त्याचेच कालांतराने 'काश्मीर' झाले.

बाराव्या शतकात कल्हान नावाचा इतिहासकार होऊन गेला. त्याच्या लिखाणा-वरून आपणास काश्मिरचा प्राचीन इतिहास थोडाफार कळू शकतो. त्याने इतिहास लिहिला तो पदयात. त्याच्या सुप्रसिद्ध 'राजतरंगिणी' ग्रंथामध्ये ३००० वर्षांचा आढावा घेतलेला आहे. त्या काळातल्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक जीवनावर प्रकाश पाडून त्याने राजदरबाराची असंख्य कारस्थाने उघडकीला आणली आहेत. त्याने केलेले काश्मिरचे वर्णन आजहि लागू पडते. प्रशस्त घरे, हिमशीतल पाणी, केशर, द्राक्षे आणि विदया – या साऱ्या गोष्टी प्राप्त करणे स्वर्गातदेखील दुरापास्त होईल. काश्मिरमध्ये मात्र त्या मुबलक प्रमाणात आहेत.'


काश्मिरचा इतिहास प्रदीर्घ आणि बहुरंगी आहे. आरंभीच्या काळात जरी हिंदू-धर्माचा वरचष्मा असला तरी खिस्तपूर्व तिसऱ्या शतकात, अशोक राजाच्या राजवटीत, लोकमत बौद्धधर्माकडे झुकू लागले होते. सुमारे हजार वर्षांनंतर, जेव्हा चिनी प्रवासी ह्युआन सँगने काश्मिरला भेट दिली, तेव्हा बौद्ध धर्माचा निश्चितपणे ऱ्हास होत होता. देशात नाना प्रकारच्या धार्मिक रूढी आणि चालीरीती प्रचलित होत्या असे त्याने लिहिले होते. याच सुमारास 'शैव' पंथ उदयाला आला. आठव्या शतकात,

नाव घेण्यासारखा, ललितादित्य नावाचा एक राजा होऊन गेला. मध्य आशिया आणि उत्तर हिंदुस्थानामधील बराचसा मुलूख पादाक्रांत केल्यामुळे तो प्रसिद्धीस आला. दहाव्या शतकात तर एका स्त्रीने काश्मीरवर राज्य केले. राणी दिद्दा तिचे नाव. निर्दयीपणाबद्दल तिची ख्याति होती. तिच्या राज्यकारभारात गैरव्यवस्था मात्र नव्हती. तेराव्या शतकात काश्मिरात इस्लामी धर्माचा प्रभाव जाणवू लागला. मुस्लिम राज्यकर्त्यांमध्ये झैन-उल-अब्दिन हा राजा अधिक गाजला. इतर धर्मांबाबतचा उदार दृष्टिकोण आणि कलांना प्रोत्साहन देणे या दोन गोष्टींसाठी तो प्रसिद्ध होता. त्यानंतर मोंगलांनी सत्ता हाती घेतली आणि ताबडतोब जागोजाग मशिदी बांधल्या आणि बागा लावल्या. जिंकलेल्या मुलखाची जणू त्यांना बूज राखायची होती. त्यानंतर आले अफगाण. अफगाणांच्या क्रौर्याच्या गोष्टी आजही सांगितल्या जातात. त्यांच्या जुलमाला कंटाळून काश्मिरी लोकांनी रणजितसिंगला मदतीसाठी बोलाविले. परिणामी, शिखांची २७ वर्षांची अल्पशी कारकीर्द झाली. १८४६ साली



राजा गुलाबसिंगने ७५ लाख रुपये देऊन ईस्ट इंडिया कंपनीकडून, सिंधू आणि रावी नदीच्या खोऱ्यांमधील सर्व जमीन खरेदी केली. १९४७ सालपर्यंत ही जमीन त्याच्या वंशजांकडे होती. फाळणीनंतर काश्मीर भारताकडे आले. जम्मू आणि काश्मीर या राज्यात आता जम्मू, काश्मीर आणि लडाख हे तीन सांस्कृतिक विभाग मोडतात.

काश्मिरमध्ये असंख्य सरोवरे आहेत. दाल सरोवर हे त्यातले सर्वांत प्रसिद्ध. श्रीनगर या राजधानीच्या शहरात, मध्यभागी विराजणाऱ्या या सरोवरावरून अनेक जुने पूल कमान टाकून उभे आहेत. हे पूल शहराचे दोन भाग सांधतात. याच सरोवरात छोटी छोटी बेटे विखुरलेली आहेत. त्यातली नावाजलेली बेटे म्हणजे चार




चिनारांचे बेट आणि नेहरू उदयान असलेले आणखी एक लहानगे बेट. चार चिनार बेटावर खरोखरच चार भव्य डौलदार वृक्ष पाण्यावर झुकून उभे आहेत.

हाऊसबोटींनी सरोवर गजबजून गेले आहे. या हाऊसबोटी म्हणजे असंख्य काश्मिरी लोकांची घरे. कित्येक हाऊसबोटी प्रवासी हंगामात भाड्याने दिल्या जातात. दिसायला चित्रातल्या प्रमाणे शोभिवंत दिसणाऱ्या हाऊसबोटी सर्व सुखसोयींनी सज्ज असतात. बैठकीची खोली, झोपायची खोली, स्नानगृह, आणि स्वयंपाकघर प्रत्येक हाऊसबोटीत स्वतंत्र असतात. काही हाऊसबोटींच्या तर स्वतःच्या मालकीच्या पाण्यातल्या बागा आहेत. काकड्या, टरबुजे आणि चेस्टनट या बागांतून होतात. इतर माल जवळपासच्या शेतमळयांमधून तोडून 'शिकाऱ्यांत' भरून आणवला जातो. शिकारा म्हणजे चपट्या बुडाची खास काश्मिरी होडी. भल्या पहाटे नाना प्रकारच्या भाजी-फळांनी लदलेले शिकारे हाऊसबोटींच्या दाटीतून वाट काढीत हिंडताना दिसून येतात. क्वचित प्रसंगी बदके आणि गीसनी लादलेला शिकारा दिसतो. तर कधी गुलाब, ट्यूलिप, आयरिस आणि ऱ्होडेनड्रोन्स या फुलांनी एखादा शिकारा बहरून जातो.

वुलर हे काश्मीरमधले आणखी एक प्रसिद्ध सरोवर. आशियामधले, गोड्या पाण्याचे हे सर्वांत मोठे सरोवर. या सरोवरामधून झेलम नदी वाहते. डोंगरांचा वेढा असलेला हा जलाशय जंगली पाखरे, गीस आणि बदके यांचा आवडता तळ आहे. पाणकणसांच्या बुडाशी ही पाखरे विसावतात. माहसीर हा प्रसिद्ध काश्मिरी मासा इथेच आढळतो.

काश्मिरमधील एक अविस्मरणीय दृश्य म्हणजे मानसबळ सरोवर. स्वच्छ पारदर्शक पाण्यावर गुलाबी कमळांचा गालिचा अंथरलेला आणि पार्श्वभूमीला बर्फाच्छादित डोंगरांची रांग, असा तो देखावा दिसतो.



निसर्गाचे निरनिराळे पैलू या प्रदेशात पाहायला मिळतात. २६,६५६ फूट उंची गाठणारी नंगा पर्वतासारखी उत्तुंग शिखरे इथे आहेत. तशीच मार्गात आडव्या



येणाऱ्या दगडी कपारी गुळगुळीत करणारी बाल्टोरसारखी बर्फाची प्रचंड पठारे आहेत. वेरीनाग, अनंतनाग, कोकारनाग आणि असंख्य इतर झरेही येथे मुबलक



प्रमाणात आहेत. निर्मळ स्वच्छ पाणी आणि औषधी गुण यांसाठी हे झरे प्रसिद्ध आहेत. सहस्रतुषारांनी आसपासचा टापू चिंब करणारे, तुफानी वेगाने कोसळणारे धबधबे याच प्रदेशात आढळतात.

या प्रचंड राज्याच्या समृद्ध सांस्कृतिक वारसाच्या खुणा येथे जागोजाग विखुरलेल्या आढळतात. थडगी, स्मारके, मंदिरे, मशिदी आणि बागा काश्मिरच्या इतिहासामधल्या निरनिराळ्या कालखंडाची साक्ष देतात. धार्मिक विविधतेची देखील त्यामुळे कल्पना येऊ शकते.






या राज्याची हिवाळी ऋतूतील राजधानी जम्मू, रावी नदीच्या उजव्या काठावर वसली आहे. एका डोंगराच्या उतरणीवर नजर खाली फेकली की भाताची हिरवी कंच शेते आणि मोहरीच्या फुलांनी बहरलेले पिवळे धमक मळे दिसतात. ठिकठिकाणी

आंबराया आहेत. आभाळाला जाऊन भिडलेली, मंदिरांची उंच शिखरे प्रामुख्याने डोळ्यांत भरतात.


राजाच्या तोंडून प्रथमच निघालेले गौरवोद्गारच एखाद्या स्थळाचे नाव म्हणून कायम करण्याची पूर्वी प्रथा होती. कित्येक सुंदर नावामागचे हेच रहस्य असावे. गुलमर्ग—फुलांचे कुरण, सोनमर्ग—सुवर्णकुरण, मोगल गार्डन्स—चष्माशाही राजेशाही झरा—शालीमार, प्रीती वास्तव्य—नसीम बाग, झुळुकींचे उदयान आणि निशात बाग—आनंदोदयान; ही झाली काही निवडक उदाहरणे.

आधीच निसर्गाचा वरदहस्त लाभलेल्या या देशाचे सौन्दर्य पाचपट वाढविण्याची जबाबदारी मोंगलांनी आपल्यावर घेतली. काश्मिरवरचे आपले प्रेम त्यांनी



अमर करून टाकले. त्यांच्या कारकीर्दीत दल सरोवराच्या परिसरात ७७७ बागा उभारल्या गेल्या. काश्मिरच्या खोऱ्याचे आज प्रतीक मानले जाणारे भव्य चिनार वृक्ष त्यांनीच लावले. बागांची आखणी करतेवेळी, आजूबाजूचा निसर्ग ते लक्षात घेत. पार्श्वभूमीला पाइन, सिडार आणि फरची वने असलेले डोंगर. तर समोर दल सरोवराचे चित्तवेधक दर्शन.









सरोवराच्या शांत संथ पाण्यात दूरवरचे बर्फाच्छादित डोंगर प्रतिबिंबित झालेले दिसतात. लहान आकाराच्या पठारांवर रंगीबेरंगी फुलांची किनार असलेल्या सुरेख बागा फुलवून त्यांनी अनेक कारंजी बांधली. वरच्या पठारावरून खालच्या पठारावर कारंजांचे पाणी झुळझुळत वाहात जाई. हा अनुपम देखावा पाहण्यासाठी जागोजाग मंडप बांधण्यात आले होते.

या प्रांतात बांधलेली स्मारके, त्यांना पुरेपूर उठाव मिळावा अशा जागीच बांधण्यात आली आहेत. एक मजेदार वैशिष्ट्य असे की देवळे आणि मशिदी जुन्या पडीक

देवळामशिदींच्या अवशेषांवर उभारण्यात आल्या आहेत. येवढेच नव्हे तर कित्येक वेळा एखाद्या मुसलमान संताच्या थडग्याशेजारी हिंदू देऊळ आढळते. अशा प्रकारे हिंदू आणि मुसलमान या दोघांना हा इलाखा पवित्र झाला आहे, त्यांचे तीर्थक्षेत्र बनला आहे. देशामधल्या धार्मिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक विभिन्नतेच्या ऐक्याची जिवंत साक्ष ही सुंदर भूमी घडविते. एक उत्तम उदाहरण म्हणजे शंकराचार्यांचे देऊळ






एक हजार फूट उंचीच्या डोंगरावर श्रीनगरच्या वर छत्र धरल्याप्रमाणे ते बांधले आहे. बहुधा ख्रिस्तपूर्व २००० व्या शतकात हे देऊळ संदिमानने बांधले. नंतर अनेक वेळा ते पुन्हा बांधण्यात आले. ज्या डोंगरावर ते बांधले आहे, तो डोंगर मुसलमान पवित्र मानतात, तर बौद्धधर्मीय लोक तेथे प्रार्थना करण्यास येतात.

सगळ्यांत डोळयात भरण्यासारख्या जर कुठल्या उद्ध्वस्त वास्तू असतील, तर त्या म्हणजे अवंतीपूर आणि मार्तंडाचे देऊळ किंवा सूर्यमंदिर होय. ख्रिस्तपूर्व २००० साली बांधलेल्या मंदिराच्या अवशेषांवर हे मार्तंडाचे देऊळ उभारले गेले. सध्याचे अवशेष आठव्या शतकात राज्य केलेल्या ललितादित्याच्या वेळचे आहेत, असे म्हणतात. खाली पसरलेल्या कुरणांची राखण करीत वर उंचावर हे एकाकी देऊळ उभे आहे.








कुतुब–उद्दिन–ऐबकने १४ व्या शतकात शहा हमदानी मशीद बांधली. नंतर ती पुन्हा बांधण्यात आली. इथे सुद्धा काली मातेला अर्पण केलेला एक झरा आहे. दूरदूरचे प्रवासी या स्थळी पूजा करायला येतात.

केवळ एक तीर्थयात्रा करून आयुष्यात केलेल्या साऱ्या पापांचे क्षालन करू इच्छिणाऱ्या हिंदू आणि मुसलमानांचे क्षेत्र आहे अमरनाथ आणि हझरतबळ. अमरनाथच्या गुहेत बर्फाचे लिंग आहे. हजार वर्षांपूर्वी देखील यात्रेकरू या ठिकाणी



येत, असे कल्हानने लिहले आहे. हझरतबळला महमदचा केस आहे. लाखो भाविक मुसलमान तो पाहयला गर्दी करतात.

अतिउत्तरेला, लडाखमध्ये सफेदी दिलेली स्मारके आहेत. त्यांना चोरतान म्हणतात. लामांची ती थडगी आहेत. लामांच्या अस्थी आणि चिखल यांचे मिश्रण



भट्टीत भाजून त्यावर बुद्धाच्या प्रतिमेचा ठसा उमटवून थडग्यात पुरतात. साऱ्या मुलखात प्रार्थना लिहिलेल्या भिंती आढळतात. 'ॐ मणि पद्मे ॐ' असा श्लोक त्यांवर लिहिलेला आहे. एक दंतकथा काश्मिरी लोक मोठ्या कौतुकाने सांगतात. मरणाच्या दारात असलेल्या जहांगीराला 'तुझी अखेरची इच्छा काय




आहे?' असे विचारण्यात आले. "मला फक्त काश्मीर हवे" असे उत्तर देऊन त्याने प्राण सोडले.

सूर्य अस्ताला जातो....

क्षणभर सोनेरी प्रभा फाकते आणि मग सारे काही झाकळून जाते. सावल्या लांबतात. काळोख होतो. एखादा शिकारा पाण्यावरून सरसरत जातो. सारे काही शांत स्तब्ध होते. ओरिओल पक्ष्यांची करुण रागिणी आणि बेडकांची जड डरांव डरांव तेवढी ऐकू येते.

डोळ्यांपुढे तरळणारी निसर्गचित्रे मनात साठवून घेऊन आपण काश्मिरचा निरोप घेतो.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
क्र. ११५५ दिनांक .......
विषय किशोर क्र. ६४१.





BVBK-0401155

# या मालेची प्रकाशित पुस्तके

| | |
|---|---|
| बापू (चित्रमय जीवन–दोन भागांत विभागून) | एफ० सी० फ्रीटास |
| काश्मीर | छायाचित्रकार : प्रेमानन्द शर्मा<br>लेखिका : माला सिंह |
| पक्षी-जगत | जमाल आरा |
| आमच्या नद्यांची कहाणी | लीला मजुमदार |
| हिमालयाच्या शिखरावर | ब्रिगेडियर ज्ञानसिंह |
| स्वर्गाची सहल व अन्य कहाण्या | लीलावती भागवत |
| सुरस कहाण्या | मनोज दास |
| स्वराज्याची कहाणी—भाग १ | विष्णू प्रभाकर |
| आमच्या आगगाड्या | जगजीत सिंह |
| भारतात विदेशी यात्रेकरू | के० सी० खन्ना |

प्रत्येकी मूल्य रु० १·५०

ही पुस्तके इंग्रजी व इतर सर्व भारतीय भाषांत प्रसिद्ध होणार आहेत.